गोपनीय/अतितात्काळ

क्र. पोमसं/२/१०(५)/बदल्या/२४/२०१६.
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,
मुंबई- ४०० ००१.
दिनांक :- ०९/०१/२०१७.

संदर्भ :- शासन आदेश, गृहविभाग, क्र. रापोसे-०११६/प्र. क्र. १८९(४)/पोल-१ अ, दि.०३/०१/२०१७.

विषय :- पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदलीबाबतचे शासन आदेश कळविण्याबाबत.

* * * * * *

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र अध्यादेश क्र. ३, दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१४ मधील कलम २२ (न) (२) मधील तरतुदींच्या अनुषंगाने, संदर्भाधिन शासन आदेशांन्वये खालील नमूद अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यास शासनाने मान्यता दिली आहे :-

| अ. क्र. | पोलीस उप अधीक्षकांचे नांव | सध्याच्या नियुक्तीचे ठिकाण | नवीन नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | श्री. हर्ष पोतदार, भापोसे | उपविभागीय पोलीस अधिकारी, वैजापूर उपविभाग, जि. औरंगाबाद | उपविभागीय पोलीस अधिकारी, करवीर उपविभाग, जि. कोल्हापूर |
| २. | श्री. राजाराम पाटील | पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय), सातारा, तथापि उपविभागीय पोलीस अधिकारी, करवीर उपविभाग, जि. कोल्हापूर येथे पदस्थापना देण्याबाबत दि.२९/११/२०१६ चे आदेश | उपविभागीय पोलीस अधिकारी, वाई उपविभाग, जि. सातारा |

२. घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की,

अ. संदर्भाधिन शासन आदेशांच्या अनुषंगाने उचित कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, व तसा अनुपालन अहवाल सत्वर या कार्यालयास सादर करावा.

आ. बदलीवरील नवीन नियुक्तीच्या ठिकाणांसंदर्भात मा. न्यायालयाचे, अथवा मा. न्यायाधिकरणाचे स्थगिती आदेश असल्यास, ते विचारात घेऊन पुढील कार्यवाही करावी.

इ. सदर आदेशांची प्रत, तसेच बदलीवरील नवीन नियुक्तीच्या ठिकाणी कार्यमुक्त करण्याच्या आदेशांची प्रत संबंधीत अधिकाऱ्यांना व्यक्तीश: अदा करुन ती त्यांना प्राप्त झाल्याबाबत त्यांची दिनांकासहित स्वाक्षरी घ्यावी, व ती पोच या कार्यालयास पाठवावी. तसेच, वरील अधिकाऱ्यांना कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करण्यात येऊ नये.

ई. सदर बदलीच्या आदेशांमुळे ज्या जागा रिक्त होणार आहेत, त्या ठिकाणांचा कार्यभार संबंधीत घटक प्रमुखांनी घटकातील इतर पोलीस अधिकाऱ्यांकडे सोपवावा.

उ. उपरोक्त आदेशांच्या अनुषंगाने संबंधीत अधिकाऱ्यांना बदलीवर विनाविलंब कार्यमुक्त करुन त्यांनी त्यांच्या नवीन नियुक्तीच्या पदावर तातडीने हजर होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करुन अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३. उपरोक्त आदेशांच्या अनुषंगाने संबंधीत अधिकाऱ्यांना त्यांच्या बदलीवरील नवीन नियुक्तीच्या टिकाणी कार्यमुक्त केल्याची, तसेच ते नवीन नियुक्तीच्या ठिकाणी रुजू झाल्याची तारीख कृपया तातडीने या कार्यालयास कळवावी. तसेच, ते जर बदलीवर नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाले नाहीत तर तसे या कार्यालयास कळवावे, आणि त्यांच्याविरुध्द या कार्यालयाचे क्र. २/५५०७, दिनांक १६/०९/१९८३, ११/०१/१९८४, व दि. १०/०२/१९९१ तसेच क्र. पोमसं/३/५५०७/६/९७, दि.१३/०२/१९९७ च्या परिपत्रकातील सूचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

Rajendra 9/1/17

**( राजेंद्र सिंह )**
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण / कोल्हापूर / सातारा.

प्रत सविनय सादर :-

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
( **लक्षवेध :- श्री. प्र. मो बलकवडे,** कक्ष अधिकारी)

प्रत सस्नेह :-

महालेखाकार-१ (लेखा व अनुज्ञेयता) / महालेखाकार-२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

प्रत :-

पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद / कोल्हापूर / सातारा.
**पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष**

२. प्रस्तुत बदलीचे आदेश **"पोलीस उपअधीक्षकांच्या बदल्या"** या शिर्षाखाली महाराष्ट्र पोलीस दलाच्या संकेत स्थळावर पुढील पंधरा दिवसांसाठी प्रसिध्द करावे.

कार्यासन अधिकारी, का. क्र. २-अ, ९, ३६ व ४०.